# घोषणा

संपादक : अजित सरदार □ १२४३/२ आपटे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४. □ फोन : 321927

दि.

सप्रेम नमस्कार,

घोषणा मासिकाचे यंदा १४ वे वर्ष चालू आहे. यावर्षी दिवाळीनिमित्त आम्ही प्रकाशीत करीत असलेल्या विशेषांकाचा विषय आहे 'धर्म आणि समाज परिवर्तन'.

धर्माचे मानवी जीवनातील स्थान आणि कार्य यासंबंधी आज तीव्रतेने प्रश्न पुन्हा उभे रहात आहेत. राजकारण असो वा समाजकारण, तत्वज्ञान असो वा नीती कल्पना किंवा सांस्कृतिक जडणघडण यामध्ये धर्माचे नेमके स्थान कोणते? धर्म संकल्पना पुन्हा एकदा परिभाषित करण्याचे प्रयत्न चालू आहेत. या वैचारिक मंथनात परिवर्तनवादी चळवळीचा घटक यानात्याने आपलेही योगदान घडावे या हेतूने मुद्दाम हा विषय आम्ही निवडला आहे.

साम्यवादी, समाजवादी आणि परिवर्तनवादी प्रवाहातही यासंबंधी वैचारिक घुसळण चालू आहे. या चर्चेत विविध थरांच्या प्रतिनिधींना, अनुभवी कार्यकर्ते व नेत्यांना आम्ही या अंकात विचार मांडण्यास सांगणार आहोत. यानिमित्ताने परस्परात वैचारिक देवाण घेवाण व्हावी असा यामागे हेतू आहे. परिवर्तनाच्या चळवळीला भविष्यातील वाटचालीत निश्चित उपयोग होईल असा विश्वास वाटतो.

आपण या अंकात आपले विचार मांडून आमच्या प्रयत्नात हातभार लावावा अशी आग्रहाची विनंती आहे. आमच्या कल्पनेप्रमाणे आपल्या लेखाचा विषय दिला आहे. यात काही बदल करावासा वाटल्यास अवश्य कळवावे.

विषय:

शब्दसंख्या: